


RNI NO-MAHMAR/2022/90217

# दैनिक जनसंचलन

निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

Email- jansanchlan@gmail.com

संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784




वर्ष ३ रे अंक : २०८ वा सोमवार दि ०६ ऑक्टोंबर २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# बोगस दिव्यांग प्रमाणपत्रांची खैरात कोणी वाटली?

## खऱ्या दिव्यांगांना न्याय मिळण्यात मोठा अडथळा!

**जनसंचलन/बुलढाणा**

महाराष्ट्रभर गाजत असलेल्या कोव्हिडं १९ काळातील करोडो रुपये भ्रष्टाचार प्रकरण सुरू असतांनाच आता जिल्हा सामान्य रुग्णालयातील काही महाभागांनी दिव्यांग शिक्षकांसह कर्मचाऱ्यांना बोगस दिव्यांग प्रमाणपत्रांची लक्ष्मी दर्शन घेऊन खऱ्या दिव्यांगाना डावलून बोगस दिव्यांगांना खैरात वाटली. तत्कालीन प्राथमिक शिक्षणाधिकारी यांनी दोन वेळेस दिव्यांगांची फेर तपासणी मुंबई जेजे हॉस्पिटल कडून करण्याचे आदेशपत्र काढले असून आज पर्यंत त्यावर कोणतीच अंमलबजावणी कारवाई झाली नाही हे विशेष दिव्यांग घटक हा कोणत्याही राष्ट्राचा अविभाज्य भाग आहे. त्यांच्या हक्कांचा आणि सन्मानाचा विचार न करता प्रगतीची चर्चा ही अपुरीच ठरते. पण गेल्या काही वर्षांत जिल्ह्यात दिव्यांग प्रमाणपत्रांचा गैरवापर मोठ्या प्रमाणावर होत असल्याचे दिसून येत आहे. शासनाच्या योजना, नोकऱ्या आणि आरक्षणाचा फायदा घेण्यासाठी काहींनी खोटी प्रमाणपत्रे तयार केली आहेत. यामुळे खऱ्या दिव्यांग नागरिकांना न्याय मिळण्यात मोठा अडथळा निर्माण झाला. त्यामुळे बोगस दिव्यांग प्रमाणपत्र जिल्हा सामान्य रुग्णालयातून संबंधित विभागातल्या कोणत्या अधिकाऱ्याने व कोणत्या कर्मचाऱ्यांनी तपासणी न करता अर्थपूर्ण लाभ घेऊन खैरातीसारखे वाटप केले, बोगस दिव्यांग प्रमाणपत्र गोलमाल करून घेणाऱ्यात जिल्हा परिषद शेकडो शिक्षकांचा सिहांचा वाटा असून इतर शासकीय कार्यालयातील काही बोगस दिव्यांग प्रमाणपत्रावर शासकीय लाभ घेणाऱ्याची यादी ही सिटी न्यूजच्या हाती लागली असून नुकतेच पदभार घेतलेले भ्रष्टाचारयांचें कर्दनकाळ दिव्यांग कल्याण सचिव तुकाराम मुंढे यांच्याकडे रीतसर पत्रव्यवहार करून सर्व पुरावे व आमचा बातमीपत्रातून पाठपुरावा दोषींवर जो पर्यंत कारवाई होत नाही तो पर्यंत आमचा सुरूच राहणार जिल्हा सामान्य रुग्णालयातील दिव्यांग/ अस्तिव्यंग विभागातील त्या डेपोटेशनवर मलई टेबलवर गब्बर झालेले नियमबाह्य चिटकून बसले आहेत त्यांची त्वरित उचलबांगडी करण्यात यावी अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्याचा इशारा करण्यात आला आहे.




अजून बरेच काही पुढील भागात...

# कुणी गाढव घेता का गाढव?

## तब्बल २०० गाढव विक्रीला..!

## परंपरा! गर्दभ राजाच्या विक्रीला सुरुवात!

**जनसंचलन/ देऊळगाव राजा**


ऐतिहासिक परंपरेनुसार श्री बालाजी महाराजांच्या यात्रोत्सवात गर्दभ राजाच्या विक्रीला सुरुवात झाली आहे. ५० पेक्षा अधिक व्यापारी त्यांची सुमारे २०० गाढवे घेऊन आलेत तर ५० टक्के गाढवांची विक्री झालेली आहे. गत ३३३ वर्षांची परंपरा असलेला श्री बालाजी महाराजांचा यात्रोत्सव मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. या यात्रेत उंच रहाट पाळण्यांची व्यवस्था असते. महिलांसाठी संसारोपयोगी वस्तू, सौंदर्य प्रसाधने तसेच लहान मुलांची खेळणी अशा विविध वस्तूंची विक्री होते. या यात्रोत्सवातील एक आकर्षण म्हणजे गर्दभ अर्थात गाढवांचा व्यापार होय. दि.३ आक्टोबर पासून या यात्रेमधील गर्दभ व्यापार सुरू झाला आहे. ५० पेक्षा अधिक व्यापारी त्यांची सुमारे २०० गाढवे घेऊन तहसील कार्यालयासमोरील नियोजित जागेत भरलेल्या बाजारात सहभागी झाले आहेत. आपल्या धार्मिक तसेच ऐतिहासिक परंपरा कायम राखण्याच्या प्रयत्नांचा भाग म्हणून श्री बालाजी संस्थानचे वंशपारंपरिक विश्वस्त राजे विजयसिंह जाधव यांनी इतरांप्रमाणेच या गाढवांच्या व्यापाऱ्याचा देखील प्रातिनिधिक स्वरूपात सत्कार केला व त्यांना आवश्यक त्या सर्व सोयी सुविधा पुरवण्याच्या संबंधितांना सूचना केल्या. जागावाटप समितीचे सदस्य जगदीश कापसे यांनी श्री बालाजी संस्थान तसेच जागावाटप समितीमार्फत या व्यापाऱ्यांच्या गाढवांची तहान भागविण्यासाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करून दिली तसेच नगरपरिषद व सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत या बाजाराच्या ठिकाणी दिव्यांची व्यवस्था करून देण्यात आली आहे. यावर्षी या बाजारात व्यापाऱ्यांनी



प्रामुख्याने कैकाडी गाढव या जातीची गाढवे विकण्यासाठी आणलेली आहेत. गाढवांची ५०% विक्रीसुद्धा झालेली आहे. एक दोन दिवसात संपूर्ण गाढवांची विक्री होऊन हा बाजार संपुष्टात येईल. जनावरांचे डॉक्टर अमोल मानतकर यांनी या गाढवांची आरोग्य तपासणी करून, त्यांच्या जखमांवर औषधोपचार करून, गाढवांसाठी व्यापाऱ्यांना आवश्यक ती औषधी वाटप केली आहे. व्यापाऱ्यांना मिळालेल्या सुविधांबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

# बावनबीरमध्ये नवदुर्गा विसर्जन मिरवणुकीला गालबोट

## दगडफेकीत पाच ते सहा जखमी, पोलीस पथक दाखल!



**जनसंचलन/ संग्रामपूर**

संग्रामपूर तालुक्यातील बावनबीर गावात नवदुर्गा देवी विसर्जन मिरवणुकीदरम्यान तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले आहे. धार्मिक उत्सवाचा जल्लोष काही क्षणांत दगडफेकीच्या हिंसाचारात बदलला! दोन्ही गटांमध्ये झालेल्या वादानंतर परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेली आणि दगडफेक सुरू झाली. या अचानक झालेल्या प्रकारात पाच ते सहा जण जखमी झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. घटनेची माहिती मिळताच संग्रामपूर पोलिसांचे पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले असून, गावात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. परिस्तिथीवर नियंत्रण मिळवण्यासाठी पोलिसांनी दक्षतेने हालचाली केल्या असून सध्या गावात पूर्ण शांतता प्रस्थापित झाली आहे. पोलीस अधिकाऱ्यांनी नागरिकांना शांतता राखण्याचे आवाहन केले असून कोणत्याही प्रकारच्या अफवांवर विश्वास ठेवू नये, असे स्पष्ट केले आहे. दरम्यान, या घटनेनंतर बावनबीर परिसरात तणावाचे वातावरण कायम असले तरी पोलिसांनी परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणात घेतली आहे.

# ...खेळखंडोबा!...

## संपादकीय लेख

पाकिस्तानात क्रिकेट खेळण्यासाठी जात असलेल्या भारतीय संघाला तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी दिलेला ङ्गमॅच भी जितो और दिल भीफ, हा संदेश आंतरराष्ट्रीय स्तरावर ङ्गस्पोर्ट्स डिप्लोमसीफ्चा मानदंड ठरला. खेळ हा केवळ मैदानात खेळला जात नाही, तर कोट्यवधी-अब्जावधी क्रीडारसिकांच्या मनावर गारूड करतो. म्हणूनच की काय, खेळाडू हे केवळ स्टार्स ठरत नाहीत, तर ते क्रीडा, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजनैतिक अशा अनेक आघाड्यांवरील राजदूत बनतात. कधी जागतिक शांततेचे आवाहन करीत, तर कधी महिला सबलीकरणासाठी नारा देत, कधी वर्णभेद दूर करण्यास, तर कधी युद्ध, नैसर्गिक आपत्तींमध्ये होरपळलेल्या नागरिकांच्या दुःखावर फुंकर घालत त्यांच्यासाठी मदतीचा हात पुढे करीत खेळ आणि खेळाडू मानवतेची विश्वव्यापी साक्ष ते देतात. ङ्गदी ब्युटिफुल गेमम असे वर्णन करण्यात येत असलेल्या फुटबॉल हा जगातील क्रमांक एकचा खेळ आहे. जागतिक फुटबॉल महासंघाचा (फिफा) वर्ल्ड कप हा अखिल विश्वाचा आकर्षणबिंदू ठरतो. ऑलिम्पिक स्पर्धेचे वेगवान, गतिमान, शक्तिमान हे ब्रीद अनुसरून जगभरातील अनेक सकारातात्मक मोहिमांना बळ मिळते. तेच स्थान भारतीयांच्या मनात क्रिकेटला आहे. क्रिकेट हा खेळ नसून धर्म आहे... वगैरे वगैरे! कपिल, धोणी, रोहितने वर्ल्ड कप उंचाविल्याचे क्षण आपण आयुष्यस्मृतींच्या खेळपट्टीवर अमर केले आहेत. विक्रमादित्य सुनील, सचिन, विराटचा जयघोष आपल्या कानी कायमचाच विसावला आहे. आणि म्हणूनच, फुटबॉल असो, की ऑलिम्पिक, की क्रिकेट... त्या एका ध्वजाखाली संपूर्ण समाज, देशच नव्हे, तर संपूर्ण जग एकवटते. मैदानाबाहेरील घटनांचे गालबोट खेळाव्यतिरिक्तच्या कारणांमुळे क्रीडा स्पर्धांना गालबोट लागल्याच्या अनेक घटना यापूर्वी जागतिक स्तरावर झाल्या आहेत. १९७२च्या म्युनिक ऑलिम्पिकदरम्यान खेळाडू अपहरणाने जग हादरले होते. अमेरिका रशिया यांच्यातील शीतयुद्धाच्या पार्श्वभूमीवर रशियातील मॉस्कोमध्ये १९८० मध्ये झालेल्या ऑलिम्पिकवर अमेरिकेने बहिष्कार टाकला होता. अमेरिकेतील लॉस एंजिल्समध्ये १९८४ मध्ये झालेल्या ऑलिम्पिक स्पर्धेवर रशियाने बहिष्काराची केलेली परतफेड केली. आखात असो, की आफ्रिका, अगदी रशिया-युक्रेन युद्धाच्या पार्श्वभूमीवर खेळ आणि खेळाडूंवर विपरीत परिणाम झाल्याचे किंवा त्यांच्यावर कारवाईचे पाऊल उचलण्यात आल्याची उदाहरणे ताजी आहेत. अजूनही ग्रँडस्लॅम टेनिस स्पर्धांसह जागतिक टेनिस स्पर्धांमध्ये रशियाच्या खेळाडूंच्या नावापुढे त्याच्या देशाचा उल्लेख आणि ध्वजाला स्थान देण्यात येत नाही. ङ्गफिफाफ्ने रशियावर टाकलेला बहिष्कार कायम आहे. त्याचप्रमाणे, जागतिक नीती व्यवहारांची मूल्ये, खेळांची नीतीमूल्ये आणि तत्वप्रणाली यांना टोलवून खेळापेक्षा कोणता खेळाडू, क्लब वा देश मोठा होऊ लागतो, तेव्हा त्यावरदेखील कारवाई करण्याची तत्परता स्थानिक आणि जागतिक क्रीडा संघटनांनी दाखवली आहे. स्पोर्ट्स डिप्लोमसीफ्ला जगभर इतकी महनीय परंपरा असताना आशिया चषक क्रिकेट स्पर्धेच्या मैदानात असा खेळखंडोबा का बरे झाला असावा? खेळाचे मैदानात आणि मैदानाबाहेर इतके अधःपतन का झाले? क्रिकेटला आपण धर्म मानतो हे खरेच आहे. पण, धर्माच्या भावनिक ङ्गखेळाफ्त क्रिकेटला खेचले गेले आहे. सुरुवात त्यांनी केली की आपण, हा मुद्दा इथे गैरलागू आहे. क्रिया प्रतिक्रियांच्या खेळामध्ये क्रिकेटचा मात्र खेळखंडोबा होतो, ही वस्तुस्थीती आहे. याकडे आपण जाणीवपूर्वक आणि सोयीस्कर दुर्लक्ष करीत आहोत. खेळ हे राष्ट्रीययत्वाचे प्रतीक असतात. आपण क्रिकेटचा वर्ल्ड कप उंचावल्यानंतर त्या जल्लोषामध्ये संपूर्ण देश एकवटून,



देहभान हरपून सहभागी होतो. मेस्सीने उंचाविलेला वर्ल्ड कप कर्जबाजारी अर्जेंटिनाला उभारी देतो. तर ऑलिम्पिक स्पर्धांच्या माध्यमातून देशाच्या आर्थिक प्रगतीला हातभार लागतो. मात्र, याच राष्ट्रीयत्वाच्या मुद्द्याला काही कट्टरतावादी विचारसरणींमुळे सीमेच्या मर्यादा ओलांडण्यास भाग पाडले (क्रिकेटच्या मैदानातील आणि देशांच्यादेखील!) तर खेळाची मूल्ये आणि नीतीमत्ता सीमापार टोलवली जाते. राजकारणाविषयी तर काय बोलावे महाराजा! आपल्याकडे आता तिन्ही त्रिकाळ राजकारणाचाच खेळ मांडण्यात येत आहे. पैशातून सत्ता, सत्तेतून पैसा हे दुष्टचक्र गल्लीपासून दिल्लीपर्यंत निर्माण झाले आहे. कला, क्रीडा, समाजकारण, संस्कृती, उत्सव हे निखळ आनंद आणि सामाजिक सौहार्दाचे साध्य नसून राजकीय, राजनैतिक अहमहमिकेत कुरघोडीच्या खेळाचे ङ्गसाधनफ बनले आहेत. त्यांना देखील आपण दावणीला बांधले आहे. आपापल्या समूहांवर आपला वरचष्मा सिद्ध करण्यासाठी आपण नकळत नव्हे, तर जाणीवपूर्वक या सर्व ङ्गसाधनांफ्चा वापर केला जात आहे. भारत पाकिस्तानच नव्हे, तर कोणत्याही खेळांच्या सामन्यांचा केवळ एक खेळ म्हणून आनंद लुटावा, त्यामध्ये इतर कोणत्याही मुद्द्यांची सरमिसळ करू नये, अशा आवाहनांना कायम भिंतींवरील सुविचाराप्रमाणेच जागा दाखवली जात आहे.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# शेतात काम करण्यासाठी निघाले, सायंकाळी पुन्हा परतलेच नाही, कुटुंबाने शोध घेतला तर..

**नागपूर :** नागपूर ग्रामीण परिसरातील सावनेर तालुक्यातील जटामखोरा गावात गुरुवारी संध्याकाळी मका पिकाच्या वादातून एका ६० वर्षीय शेतकऱ्याची निर्दयपणे हत्या करण्यात आली. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून, माणसाच्या जीवाची किंमत किती स्वस्त झाली आहे, यावर प्रश्नचिन्ह निर्माण झालं आहे. मृत शेतकऱ्याचं नाव वामन मोहन इरपाची (वय ६०) असं असून ते आपल्या साळ्याच्या शेतात काम करण्यासाठी गेले होते. संध्याकाळी उशिरापर्यंत ते परतले नाहीत म्हणून कुटुंबीय शोध घेऊ लागले. अखेर त्यांचा मृतदेह शेतातील पाण्याने भरलेल्या खड्ड्यात तरंगताना आढळून आला.



प्राथमिक चौकशीतून समोर आलेल्या माहितीनुसार, आरोपी मनीष काठुलाल उईके याला संशय होता की त्याच्या मका पिकाची चोरी होत आहे. याच संशयावरून त्याने वामन इरपाची यांच्याशी वाद घातला. हा वाद काही क्षणांतच चिघळला आणि मनीषने संतापाच्या भरात लाठीनं वामन यांच्यावर तुटून पडत निर्दयपणे मारहाण केली. या जबर मारहाणीमुळे वामन यांचा जागीच मृत्यू झाला. हत्या केल्यानंतर आरोपीने आपला मानसिक तोल सुटल्याचा सांगत मृतदेह पाण्याच्या खड्ड्यात फेकला, जेणेकरून गुन्हा लपवता येईल. परंतु काही तासांनंतर त्याचे धैर्य सुटले आणि त्याने थेट पोलीस ठाण्यात जाऊन आत्मसमर्पण केलं.घटनेची माहिती मिळताच सावनेर उपविभागीय पोलिस अधिकारी (एसडीपीओ) सागर खर्डे, ठाणे प्रमुख आशीष ठाकूर तसेच फॉरेन्सिक पथकाने घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी जागेची पाहणी करून महत्त्वाचे पुरावे जप्त केले. मृतदेहाचे शवविच्छेदन करून नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला आहे. पोलिसांनी आरोपी मनीष उईके विरुद्ध हत्येचा गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे. या क्रूर हत्येमुळे संपूर्ण गावात शोककळा पसरली आहे. केवळ मका पिकासारख्या किरकोळ वादातून एका वयोवृद्ध शेतकऱ्याचा जीव जाण्याची घटना ग्रामस्थांना हादरवून गेली आहे. समाजात वाढत चाललेली असहिष्णुता आणि संवेदनशून्यता यावर या घटनेने पुन्हा एकदा गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण केलं आहे.

## लग्नाला नकार देताच क्रीडा क्षेत्रातल्या तरुणीचं टोकाचं पाऊल

**अहिल्यानगर :** समाजमन हेलावून टाकणारी एक धक्कादायक घटना जिल्ह्यातील भिंगार शहरातील गवळीवाडा परिसरात उघडकीस आली आहे. लग्नाचं आमिष दाखवून एका तरुणानं २३ वर्षीय तरुणीवर शारीरिक संबंध प्रस्थापित केले. मात्र, नंतर लग्नास नकार देत तिच्यासोबत मानसिक छळ सुरू केला. एवढेच नव्हे तर, या त्रासाला त्याच्या कुटुंबीयांनी व मित्रांनीही खतपाणी घातल्यानं अखेर पीडितेने आपलं जीवन संपवलं. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.मयत तरुणीच्या वडिलांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, दीपक अशोक आव्हाड (रा. माणिकदौंडी रस्ता, पाथर्डी) याने सप्टेंबर २०२४ पासून सप्टेंबर २०२५ या कालावधीत लग्नाचे खोटे आमिष दाखवत तरुणीशी जवळीक निर्माण केली. या काळात त्याने तिच्याशी शारीरिक संबंध ठेवले. मात्र, लग्नाची वेळ आल्यावर दीपकने टाळाटाळ करण्यास सुरुवात केली. याचदरम्यान दीपकची बहीण, तसेच ज्ञानेश्वर ऊर्फ माऊली शिरसाठ आणि बाबूजी नाकाडे (दोघे रा. पाथर्डी) यांनी देखील 'हे लग्न होऊ देणार नाही' असं म्हणत तरुणीचा मानसिक छळ सुरू केला. सततच्या या शारीरिक व मानसिक त्रासामुळे संतप्त व हतबल झालेल्या तरुणीने आत्महत्या करण्याचा मार्ग निवडला.

ही घटना उघडकीस आल्यानंतर भिंगार कॅम्प पोलिस ठाण्यात आरोपी दीपक आव्हाड, त्याची बहीण, ज्ञानेश्वर शिरसाठ आणि बाबूजी नाकाडे यांच्याविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गंभीर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक गजेंद्र इंगळे करीत आहेत. परिसरात या घटनेबाबत संताप व्यक्त होत असून, 'लग्नाचं आमिष दाखवून फसवणूक करणाऱ्यांवर कठोर कारवाई व्हावी', अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## कॅफेत तरुणाला संपवल

**नाशिक :** शहरातील पाथर्डी फाटा परिसरात २१ वर्षीय युवकाची हत्या करण्यात आली होती. या हत्येत सहभागी असलेल्या संशयीत आरोपींना पळून जाण्यासाठी आर्थिक मदत आणि अस्तित्व लपवून ठेवण्यासाठी मदत करणाऱ्या बांधकाम व्यावसायिकाला अटक करण्यात आली आहे. गुन्हे शाखा युनिट २च्या पथकाने राणाप्रताप चौक, सिडको येथे ही कारवाई केली. किस्मम अली आजम अली अन्सारी असं या संशयिताचं नाव आहे.२५ सप्टेंबर रोजी राशिद खान या २१ वर्षीय तरुणाला फोन करून कॅफेतअ बोलावलं होतं. पाथर्डी फाटा परिसरातील एका कॅफेत जुन्या वादाची कुरापत काढून त्याच्यावर वार करण्यात आले होते. चार संशयीत आरोपींनी त्याच्यावर धारदार शस्त्राने वार केले होते. या हल्ल्यात राशिद खान हा जबर जखमी झाला होता. पोलीस घटनास्थळी दाखल झाल्यानंतर राशिदला जिल्हा शासकीय रुग्णात दाखल करण्यात आलं. मात्र, डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केलं होतं.

## मुख्यालयात २५ लाखांची लाच घेताना ठाणे मनपा उपायुक्तच जाळ्यात

**ठाणे :** ठाणे महापालिकेच्या अतिक्रमण आणि निष्कासन विभागाचे उपायुक्त शंकर पाटोळे याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या छाप्यात अटक करण्यात आली. त्यामुळे पालिका अधिकाऱ्यांमध्ये अस्वस्थता पसरली आहे. एकीकडे शहरातील अनधिकृत बांधकामांची न्यायालयीन चौकशी सुरु असताना या प्रक्रियेतील प्रमुख अधिकारी २५ लाखांची लाच घेताना जाळ्यात अडकल्याने आता या पदावर स्वच्छ प्रतिमेच्या अधिकाऱ्याची नियुक्ती व्हावी, अशी चर्चा पालिका वर्तुळात रंगली आहे. पाटोळे याच्या जागी आता अतिक्रमण उपायुक्तपदी कोणाची वर्णी लागणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.दसऱ्याच्या पूर्वसंध्येला बुधवारी ठाणे महापालिका मुख्यालयातून लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या कारवाईत रात्री उशिरा पाटोळे व त्याचा सहकारी ओम कार गायकर याला अटक करण्यात आली. त्यानंतर गुरुवारी दसऱ्याच्या निमित्ताने पालिका मुख्यालयाला सुट्टी होती. शुक्रवारी पालिकेचे कामकाज नेहमीप्रमाणे सुरु झाले. मात्र विविध विभागांसह अधिकाऱ्यांच्या दालनातही या कारवाईची जोरदार चर्चा रंगली होतीठाणे पालिकेच्या कारकिर्दीत उपायुक्त दर्जाच्या अधिकाऱ्याला या पद्धतीने मुख्यालयात लाच घेताना अटक होण्याची नामुष्की पहिल्यांदाच आल्याने पालिका प्रशासनाची प्रतिमा मलिन झाल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. त्यामुळे आता या पदाची जबाबदारी स्वच्छ प्रतिमेच्या अधिकाऱ्याकडे देणे आवश्यक आहे. या अधिकाऱ्यावर अनधिकृत बांधकामांवर कारवाई करताना कोणत्याही पद्धतीचा राजकीय दबाव नसावा, तोडक कारवाई व इतर कामकाजात राजकीय नेत्यांच्या समर्थकांनी ढवळाढवळ न केल्यास अधिकाऱ्यांना प्रभावी पद्धतीने काम करता येईल, असेही पालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी नमूद केले.

## गौतमी पाटील हिला अटक होणार?

**पुणे :** नृत्यांगना गौतमी पाटील हिच्या अडचणी वाढवणारी बातमी समोर येत आहे. पुणे पोलिसांनी अपघात प्रकरणी गौतमी पाटील हिला नोटीस पाठवली आहे. गौतमी पाटील हिच्या वाहनाने रिक्षाला धडक दिली होती. या अपघातात रिक्षाचालक गंभीर जखमी झाला होता. संबंधित वाहन हे गौतमी पाटीलच्या नावाने असल्याची माहिती आहे. त्यामुळे पुणे पोलिसांनी तपासासाठी तिला नोटीस बजावली आहे. सिंहगड रोड पोलिसांनी गौतमीला नोटीस बजावली आहे.पुण्यातील वडगाव बुद्रुक परिसरात मंगळवारी पहाटे अपघाताची घटना घडली होती. या प्रकरणी पुणे पोलिसांनी गौतमी पाटील हिच्या गाडी चालकाला अटक केली होती. दरम्यान, ज्या वाहनाने रिक्षाला धडक दिली ते वाहन गौतमी पाटीलच्या नावाने असल्या मुळे सिंहगड रोड पोलिसांनी तिला नोटीस पाठवली आहे. प्रकरणी चौकशीसाठी हजर राहावे असे नोटीसमध्ये बजावण्यात आले आहे.

# संतप्त जमावाकडून पोलिस स्टेशनवर दगडफेक

## कळवणमध्ये आदिवासी आंदोलनाला हिंसक वळण, गाडीच्या काचाही फोडल्या

**नाशिक :** नाशिकच्या कळवण पोलिस स्थानकावर संतप्त आदिवासी आंदोलकांच्या जमावाने पोलीस ठाण्यावर दगडफेक केल्याचा प्रकार घडल्याने एकच धावपळ उडाली. कळवण खुर्द येथील शेतकऱ्याने शेतमजूर विठोबा पवार यांचं अपहरण करून खून केल्याचा आरोप करीत संबंधितांवर गुन्हा दाखल करून अटक करावी अशी मागणी केली. या मागणीसाठी आदिवासी बांधवांनी कळवण पोलिसांसमोर ठिय्या आंदोलन सुरु केलं असता पोलीस व आंदोलनकर्त्यांमध्ये वाद झाला. त्यातूनच आदिवासी बांधवानी थेट पोलीस स्थानकावरच दगडफेक केल्यानं एकच धावपळ उडाली. दगडफेकीत पोलिस कर्मचारी व पत्रकार जखमी झाले असून, तर पोलिस वाहनाच्या काचाही फुटल्या. या घटनेमुळे काही काळ तणावाचं वातावरण निर्माण झालं होतं. या घटनेनंतर पोलिसांनी अपहरण करणाऱ्या संशयितांविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, नाशिकच्या कळवण पोलीस स्थानकावर संतप्त आदिवासी आंदोलकांच्या जमावाने पोलिस ठाण्यावर दगडफेक केल्याचा प्रकार घडल्याने



एकच धावपळ उडाली. कळवण खुर्द येथील शेतकऱ्याने शेतमजूर विठोबा पवार यांचं अपहरण करून खून केल्याचा आरोप करीत संबंधितांवर गुन्हा दाखल करून अटक करावी, या मागणीसाठी आदिवासी बांधवांनी कळवण पोलिसासमोर ठिय्या आंदोलन सुरु केले होतं. दरम्यान, पोलीस व आंदोलनकर्त्यामध्ये वाद होऊन त्यातूनच आदिवासी बांधवानी थेट पोलीस स्थानकावरच दगडफेक केल्याने एकच धावपळ उडाली.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# 'रो-को' वर्ल्ड कप खेळणार नाही?

## चीफ सेलेक्टर आगरकरांच्या वक्तव्याने फॅन्सना धक्का

**सिंधुदुर्ग :** बीसीसीआयच्या सिलेक्शन कमिटीने ऑस्ट्रेलिया विरुद्ध होणाऱ्या वनडे आणि टी २० सीरिजसाठी टीम इंडियाची घोषणा केली आहे. वनडे आणि टी २० फॉरमॅटमध्ये टीम इंडिया प्रत्येकी तीन सामने खेळणार आहे. सिलेक्शन कमिटीने वर्ल्ड कप २०२७ लक्षात घेऊन शुभमन गिलला वनडे कर्णधार बनवलंय, त्यामुळे ऑस्ट्रेलिया विरुद्ध होणाऱ्या सीरिजमध्ये तो भारतीय संघाचं नेतृत्व करेल. तर टीम इंडियाचे दिग्गज खेळाडू रोहित शर्मा आणि विराट कोहली हे शुभमन गिलच्या नेतृत्वात खेळताना दिसतील. दरम्यान चीफ सेलेक्टर अजित आगरकर यांनी पत्रकार परिषदेत केलेलं वक्तव्य चांगलंच चर्चेत आहे. ज्यामुळे रोहित आणि विराटच्या फॅन्सना धक्का बसल्याशिवाय राहणार नाही.

चीफ सेलेक्टर अजित आगरकरने रोहित शर्मा आणि विराट कोहली यांच्या वर्ल्ड कप २०२७ मध्ये भाग घेण्यावर मोठं वक्तव्य केलं आहे. अजित आगरकरांनी स्पष्ट म्हटलं आहे की रोहित शर्मा आणि विराट कोहली हे दोघे वर्ल्ड कप २०२७ खेळण्याबाबत नॉन कमिटेड आहेत. अजित आगरकरांच्या या वक्तव्यावरून अशी शंका उपस्थित केली जातेय की रोहित शर्मा आणि विराट कोहली वर्ल्ड कप २०२७ मध्ये खेळताना दिसणार नाहीत. भारताच्या कोट्यवधी क्रिकेट फॅन्ससाठी हा खूप मोठा धक्का असणार आहे. अजित आगरकरांनी याशिवाय सांगितलं की, विराट आणि रोहित यांना संदेश पाठवण्यात आलाय की ते जेव्हा रिकामे असतील किंवा आंतरराष्ट्रीय साम ना खेळत नसतील तेव्हा त्यांनी देशांतर्गत क्रिकेट सामने खेळावेत.

बीसीसीआयने ऑस्ट्रेलिया दौऱ्यासाठी ३ सामन्यांची ओडीआय सीरिज (१९ ऑक्टोबरपासून) आणि ५ सामन्यांची टी-२० सीरिज (२९ ऑक्टोबरपासून) यासाठी संघांची घोषणा केली आहे. शुभमन गिल यांना जळख कर्णधार बनवण्यात आले आहे. हे वर्ल्ड कप २०२७ लक्षात घेऊन घेतलेले म हत्वाचे निर्णय आहे. रोहित शर्मा आणि विराट कोहली यांचा जळख संघात समावेश आहे. ते शुभमन गिलच्या नेतृत्वात खेळतील. ते फक्त एकदिवसीय फॉरमॅटवर लक्ष केंद्रित करत आहेत, टेस्ट आणि टी-२० मधून दोघे निवृत्त झाले आहेत.

### नेमकं काय म्हणाले आगरकर?

■ अजित आगरकरने म्हटले की, 'आम्ही आधीच स्पष्ट केलं की जर खेळाडू रिकामे असतील तर त्यांनी देशांतार्गत क्रिकेट खेळावं'. अजित आगरकर यांनी रोहित शर्मा आणि विराट कोहली यांना टीम इंडियाचे नेतृत्व करत राहण्याचे समर्थन केले आहे. ड्रेसिंग रूममध्ये ते अजूनही लीडर आहेत असे ते म्हणाले. अजित आगरकर म्हणाले, 'ते (रोहित आणि विराट) गेल्या अनेक वर्षांपासून टीम इंडियाचे मार्गद-र्शन करत आहेत. ते धावा करण्याचा प्रयत्न करत राहतात. ते अजूनही ड्रेसिंग रूममध्ये आघाडीवर आहेत. ते या फॉरमॅटमध्ये खूप यशस्वी झाले आहेत. ऑस्ट्रेलिया वनडे सीरिजसाठी या संघाची निवड झाली आहे, तुम्हाला जास्त विचार करण्याची गरज नाही'.






# पॅरा ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप स्पर्धेत भारताची नाचक्की!

## स्टेडियममध्ये घुसले कुत्रे अनब घेतला चावा



**दिल्ली :** दिल्लीतील जवाहरलाल नेहरू स्टेडियम मध्ये सुरू असलेल्या वर्ल्ड पॅरा ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप २०२५ दरम्यान शुक्रवारी मोठा प्रकार घडला. स्टेडियमम ध्ये घुसलेल्या भटक्या कुत्र्यांनी केनिया व जपानच्या कोचवर हल्ला केला, इतकंच नव्हे तर एका सिक्युरिटी गार्डलाही चावा घेतला. काही मिनिटांत घडलेल्या या मालिकेच्या घटनांमुळे मैदानात गोंधळ उडाला आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर आयोजकांची मोठी बदनामी झाली.

समितीने सांगितले की, २१ ऑगस्ट २०२५ रोजीच एमसीडीला पत्र लिहून स्टेडियममधील आवारा कुत्रे हटवण्याची विनंती करण्यात आली होती. स्पर्धा सुरू होण्याआधी साफसफाईही झाली होती. मात्र खाण्याच्या वासामुळे हे कुत्रे पुन्हा आत घुसले. आता परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी स्टेडियम परिसराचे सॅनिटायझेशन करण्यात आले असून सुरक्षा व्यवस्था वाढवली आहे. एमसीडीने तातडीने कुत्रे पकडणाऱ्या दोन विशेष टीम्स स्टेडियममध्ये कायमस्वरूपी तैनात केल्या आहेत.

या घटनेमुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर भारतातील क्रीडा स्पर्धांच्या सुरक्षेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

### कशी घडली घटना?

सकाळी सुमारे ९.१८ वाजता जपानची कोच मेइको ओकुमत्सु आपल्या खेळाडूंच्या ट्रेनिंगवर लक्ष ठेवत असताना एका कुत्र्याने त्यांच्यावर झडप घातली. त्यानंतर ९.४२ वाजता केनियाचा कोच डेनिस माराजिया कॉल रूमजवळ खेळाडूसोबत चर्चा करत होता, त्याच वेळी दुसऱ्या कुत्र्याने त्याला चावा घेतला. या दोन्ही घटनांमुळे मैदानात उपस्थित खेळाडू व अधिकाऱ्यांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले. त्याच दरम्यान एका सिक्युरिटी गार्डलाही हल्ल्याचा बळी व्हावे लागले.

# वेस्ट इंडिजला हरवले आणि भारत WTC शिखराच्या जवळ!



**नवी दिल्ली :** भारतीय क्रिकेट संघाने पहिल्या कसोटी सामन्यात वेस्ट इंडिजचा एक डाव आणि १४० धावांनी दणदणीत पराभव केला आहे. रवींद्र जडेजा, केएल राहुल, ध्रुव जुरेल आणि मोहम्मद शमी यांनी भारतीय संघासाठी दमदार कामगिरी केली. या खेळाडूंनी भारताच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली. या विजयासह टीम इंडियाने मालिकेत १-० अशी आघाडी घेतली. या विजयामुळे आता थढउ पॉइंट्स टेबलमध्ये भारतीय संघाला फायदा झाला आहे.

वेस्ट इंडिजविरुद्धच्या सामन्यापूर्वी, भारतीय संघ २०२५-२७ च्या जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेत तिसऱ्या स्थानावर होता आणि तिसऱ्या स्थानावर आहे. तथापि, विजयानंतर, भारतीय संघाचा PCT वाढला आहे. भारताचा PCT आता ४६.६७ वरून ५५.५६ झाला आहे. २०२५-२७ च्या वर्ल्ड टेस्ट चॅम्पिअनशीप पॉइंट्स टेबलमध्ये, भारतीय संघाने आतापर्यंत एकूण सहा सामने खेळले आहेत, ज्यात तीन जिंकले आहेत, दोन गमावले आहेत आणि एक अनिर्णित राहिला आहे. २०२५-२७ च्या जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेसाठी ऑस्ट्रेलियन संघ गुणतालिकेत अव्वल स्थानावर आहे. संघाने आतापर्यंत तीन सामने खेळले आहेत आणि तिन्ही सामने जिंकले आहेत. त्याचा पीसीटी १००.०० आहे. श्रीलंकेचा संघ दुसऱ्या स्थानावर आहे. संघाने आतापर्यंत दोन सामने खेळले आहेत, एक जिंकला आणि एक अनिर्णित राहिला. त्याचा पीसीटी ६६.६७ आहे.

भारताविरुद्ध प्रथम फलंदाजी करणाऱ्या वेस्ट इंडिजच्या संघाने फक्त १६२ धावा केल्या. त्यानंतर भारतीय संघासाठी रवींद्र जडेजा, ध्रुव जुरेल आणि केएल राहुल यांनी शतके केली. या खेळाडूंमुळे टीम इंडियाने पहिल्या डावात ४४८ धावा केल्या आणि २८६ धावांची मोठी आघाडी घेतली. त्यानंतर, दुसऱ्या डावात रवींद्र जडेजाच्या कामगिरीवर विंडीजचे फलंदाज टिकून राहू शकले नाहीत आणि ते आपत्तीजनक ठरले. दुसऱ्या डावात वेस्ट इंडिजच्या संघाने फक्त १४६ धावा केल्या.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# लोकांना चांगली सेवा देवून जिल्ह्याचे नावलौकिक करा सहपालकमंत्री ना. संजय सावकारे

## १८६ अनुकंपा आणि ७१ एमपीएससी उमेदवारांना नियुक्तीपत्र प्रदान

जनसंचलन/बुलढाणा

लोकांना चांगली सेवा देवून जिल्ह्याचे नावलौकिक करा, असे आवाहन जिल्ह्याचे सहपालकमंत्री ना. संजय सावकारे यांना आज जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित रोजगार मेळाव्यात केले. मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांच्या महत्वाकांक्षी १५० दिवस कृती कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यातील अनुकंपा आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या लिपीक संवर्गातील उमेदवारांना ना. संजय सावकारे यांच्या हस्ते नियुक्तीपत्रे प्रदान करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाला आमदार संजय गायकवाड, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, पोलीस अधीक्षक निलेश तांबे, उप वनसंरक्षक सरोज गवस, उपजिल्हाधिकारी डॉ. जयश्री ठाकरे, निवासी उपजिल्हाधिकारी सदाशीव शेलार, माजी आमदार विजयराज शिंदे आदी अधिकारी व उमेदवार उपस्थित होते. सहपालकमंत्री ना. संजय सावकारे पुढे म्हणाले, नव नियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांनी त्यांना सोपवलेली कामे वेळेत पूर्ण करावीत, चांगले काम करणाऱ्यांना चांगल्या संधी मिळतातच. लोकांना चांगली सेवा देत स्वत:चे आणि जिल्ह्याचे नाव मोठे करा. जिल्ह्यात चांगली पर्यटन स्थळे आहेत. पर्यटनवृद्धीसाठी मोठी संधी आहे, त्यादृष्टीने शासन प्रशासन काम करत आहे. या पर्यटनस्थळी विविध सुविधाही निर्माण केल्या जात आहेत. नव नियुक्त अधिकारी कर्मचाऱ्यांनीसुद्धा जिल्ह्याच्या पर्यटनावृद्धीला चालना देण्यासाठी काम करावे, असे आवाहन सहपालकमंत्री ना. सावकारे यांनी यावेळी केले. जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील म्हणाले की, नवनियुक्त कर्मचाऱ्यांनी जनतेच्या सेवेसाठी आपण इथे आहोत हे कायम स्मरणात ठेवून काम करावे. लोकांच्या सेवेसाठी पारदर्शक आणि गतिमान पद्धतीने काम केले पाहिजे. गरजूंना सदैव मदतीचा हात दिला पाहिजे. प्रशासकीय कामकाजाच्या कोणत्याही टप्प्यावर कोणाचीही अडवणूक किंवा पिळवणूक होता कामा नये, असे त्यांनी आवाहन केले. तसेच अनुकंपा अंतर्गत क व ड वर्ग पदांच्या नियुक्त्या पारदर्शक पद्धतीने केल्या आहेत. यात ड वर्गाची प्रतिक्षा यादी शुन्य




झाली आहे. त्यांच्या नियुक्त्या पूर्ण झाल्या आहेत. क वर्ग पदांच्या नियुक्त्या टप्प्याटप्प्याने पूर्ण केल्या जाणार आहेत. नवनियुक्त १८६ अनुकंपा आणि ७१ एमपीएससी उमेदवारांना लवकरच जिल्हास्तरावर एक दिवसाचे प्रशिक्षण दिले जाणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी यावेळी दिली. जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात पार पडलेल्या या कार्यक्रमात सहपालकमंत्री ना. संजय सावकारे यांच्या हस्ते १८६ अनुकंपा उमेदवारांना आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची शिफारस प्राप्त ७१ उमेदवारांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. या उमेदवारांना राज्य शासनाच्या विविध विभाग, जिल्हा परिषदेच्या ग्रामविकास विभाग, नगरपरिषद, पोलीस इ विभागांमध्ये नियुक्ती देण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक निवासी उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार यांनी तर आभार प्रदर्शन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले.

---

# सर्व जातीय धर्मीय वधू वर परिचय मेळावा व पुरस्कार वितरण कार्यक्रम बुलढाण्यात संपन्न....

जनसंचलन/बुलढाणा

बुलढाणा जिल्ह्यामध्ये नव्हे तर महाराष्ट्रामध्ये संपूर्ण २५ पुरस्काराचे वितरण करण्यात आले आहे. बुलढाण्यामध्ये प्रमुख व आम्रपालीपी अवसरमोल यांना राज्यस्तरीय रणरागिनी पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे त्यानंतर डॉक्टर मंजुराजे जाधव यांना उत्कृष्ट कवी बहिणाबाई पुरस्काराने सन्मानित करण्यात आले त्याचप्रमाणे डॉक्टर गजेंद्र निकम यांच्या कन्या यांना योगा विषयी राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मान करण्यात आले. गणेश कदम यांना उत्कृष्ट कलावंत यांना राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे यामध्ये जास्तीत जास्त पुरस्काराची वितरण हे बुलढाणा जिल्ह्यामध्ये उत्कृष्ट कलाशिक्षण व क्रीडा सामाजिक यामध्ये देण्यात आलेले आहे. संजीवनी संस्थेकडून दरवर्षीप्रमाणे याही वर्षी २५ पुरस्कार वाटप करण्यात आले त्यामध्ये शैक्षणिक स्मिता विठ्ठलराव शिरसागर यांना आदर्श राज्यस्तरीय मुक्ता कांबळे आदर्श शिक्षिका पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले मंगला लक्ष्मण ठाकरे यांना धन्वंतरी आरोग्यसेवा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले सीता भारत भगत यांना उत्कृष्ट वन सेवक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले संजीवनी संस्थेचा उत्कृष्ट असा पुरस्कार वैशाली गजेंद्र निकम



राज्यस्तरीय युवा योगा क्रीडा पुरस्कार म्हणून त्यांना सन्मानित करण्यात आले शिवाजी विठोबा सुरोशे यांना सेंद्रिय शेती कृषी भूषण पुरस्कार देऊन संमत करण्यात आले तसेच गोपाल भगवानराव तुपकर यांना राज्यस्तरी उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले भगवान कचरुबा पाटील संत गाडगेबाबा पुरस्कार देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले शाहीर गणेश कदम यांना कला गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले इत्यादी पंचवीस पुरस्कार देऊन सन्माननीय संजीवनी राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सर्वांना सन्मानित करण्यात आले आहे.

---

# रिया वेलनेस सेंटरमध्ये गरबा फेस्टिवल २०२५ चे आयोजन आणि बक्षिस वितरण संपन्न

जनसंचलन/बुलढाणा

दरवर्षी प्रमाणे संपुर्ण भारतभर नवरात्र उत्सव मोठ्या आनंदात साजरा करण्यात येतो, अनेक वर्षांपासून बुलडाणा येथील सुपरिचित नामांकित रिया वेलनेस हेल्थ फिटनेस सेंटर तर्फे नवरात्र उत्सव साजरा करण्यात येतो, दरवर्षी गरबा नाईटस कार्यकमाचे आयोजन करण्यात येत असुन या मध्ये शहरातील महिलांचा उत्सुर्फ प्रतिसाद मिळत असल्याने यावर्षी सुद्धा महिलांचा मोठ्या प्रमाणात सहभाग दिसुन आला आहे. रिया वेलनेस फिटनेस हेल्थ सेंटर च्या सर्वस्वी रोहिणी देशमुख याच्या सहभाग आणि नियोजन बद्ध कार्यक्रमाची ओळख संपूर्ण जिल्ह्यात परिचित आहे रोहिणी देशमुख यांचे रिया वेलनेस फिटनेस हेल्थ सेंटर मध्ये अनेक वर्षापासून आरोग्य बद्दल वर्कआउट वजन कमी करणे योगा आणि जिम मधुन अनेक महिला, पुरुष, मुले यांना तंदुरूस्त जिवन मिळाले असून दररोजच्या धावपळीच्या कामामधून आजारापासून होणारे अनेक आजार या पासुन मुक्तता मिळाली आहे, अनेक महिला, मुली, पुरुष, तथा मुले यांनी आपले वजन कमी केले आहे, शरीराला जपण्याच्या एकमेव मार्ग म्हणजे वर्कआउट आणि जिम व योगा द्वारे देशमुख मॅडम ह्या अनेकवर्षापासून कार्य करत आहे, त्यावर त्यांची जिद्द, मेहनत, चिकाटी सर्वदूर परिचित आहे. त्याच सोबत त्यांनी गेली अनेक वर्षापासून हेल्थ सोबत महिलांची आवड आणि श्रध्दा लक्षात घेऊन नवरात्रमध्ये गरबा नाईट चे यशस्वी आयोजनाची सुरुवात बुलडाणा मध्ये केली आहे, यावर्षी सुद्धा नवरात्र गरबा नाईट द्वारे भव्य दिव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, यामध्ये अनेक, महिला, मुलीने या स्पर्धा मध्ये आपला सहभाग दर्शविला, होता, कार्यक्रमाची सांगता आणि पुरस्कार वितरण बुलढाणा विधानसभा मतदार संघाचे लोकप्रिय आमदार संजय जी गायकवाड यांच्या हस्ते देवीची महाआरती घेण्यात आली यांना रिया वेलनेस फिटनेस हेल्थ सेंटरच्या सर्वस्वी रोहिणी देशमुख यांनी आमंत्रित करून त्यांच्या हस्ते बक्षीस समारंभ पार पाडण्यात आले,

# शिवसाई युनिव्हर्सल चा मुलांचा संघ विभागीय स्तरावर...

**जनसंचलन/ बुलढाणा**

बुलढाणा येथील सुप्रसिद्ध शिवसाई युनिव्हर्सल स्कूल कोलवड १४ वर्ष वयोगटाचा मुलांचा खो-खो संघ विभागीय स्तरावर पात्र ठरला आहे. किडा युवक सहसंचालनाय महाराष्ट्र राज्य पुणे. जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय बुलढाणा. जिल्हा क्रीडा परिषद बुलढाणा. यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दि ३ ऑक्टोबर २०२५ जिल्हास्तरीय खो खो स्पर्धेचे आयोजन जिजामाता व्यापारी ला संकुल बुलढाणा या ठिकाणी करण्यात आले होते. या स्पर्धेत बुलढाणा तालुक्याचे प्रतिनिधित्व शिवसाई युनिव्हर्सल स्कूल चे विद्यार्थी होते. १४ वर्षे आतील मुलांच्या गटामध्ये मोताळा मलकापूर सिंदखेडराजा व चिखली या तालुक्यांचा समावेश होता. आपल्या गटामध्ये विजेतेपद संपादन करून फायनल मध्ये जळगाव जामोद तालुक्याचे प्रतिनिधित्व करणारा भिंगार याचा संघासोबत अंतिम सामना त्या ठिकाणी खेळवला गेला. त्या सामन्यात बुलढाणा संघाने जळगाव जामोद संघाचा पराभव करून आपले विभागीय शालेय स्पर्धेसाठी स्थान निश्चित केले. बुलढाणा संघाने पहिल्या आक्रमणात जळगाव जामोद संघाचे १० खेळाडू बाद केले. तर जळगाव जामोद संघाने बुलढाणा संघाचे ८ खेळाडू बाद केले. मध्यंतरामध्ये बुलढाणा संघाकडे दोन गड्यांची आघाडी होती. दुसऱ्या आक्रमणामध्ये उत्कृष्ट खेळी करून एखादी विजय बुलढाणा संघाने खेचून आणला. या संघामध्ये अनेक अष्टपैलू खेळाडू उत्कृष्ट असं प्रदर्शन करून विजय संपादन केला. त्या अंतिम सामान्यात ऋषिकेश जाधव,रितेश पवार, कार्तिक पवार ,रोशन पवार ,आयुष मस्के ,स्वराज जाधव, यांनी उत्कृष्ट खेळी करून आपल्या संघास विजय संपादन करून दिला. व विभागीय स्पर्धेसाठी आपले स्थान निश्चित केले. संघाला मार्गदर्शन सागर उबाळे माजी खेळाडू गणेश राजपूत ,निलेश पवार सर ,कविता घुबे ,यांनी मार्गदर्शन केले. शिवसाई युनिव्हर्सल स्कूलचे संचालक डी एस लहाने सर, व प्राचार्य प्रमोद मोहरकर सर यांनी खेळाडूंची अभिनंदन केले. सामन्यानंतर बक्षीस वितरणासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी महानकर साहेब,



कैलास करवंदे, संजय सावंत, व क्रीडा राज्य मार्गदर्शिका उज्वला लांडगे मॅडम यांच्या शुभहस्ते विजय संघास ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. सदर संघ अमरावती विभागीय स्तरावर बुलढाणा जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहे.

# वैचारिक प्रबोधनाचे लोकनाट्य दर्शन: लग्नाची केली घाई, जीव गेला बाईने रसिकांचे हृदय हेलावले!

## दे. माळीच्या ७५ वर्षाच्या समृद्ध वारशाचा तेजस्वी जागर; पांडुरंग कृपा भारूड मंडळाच्या नाट्यप्रयोगाला अभूतपूर्व गर्दी

**जनसंचलन/ बुलढाणा**

महाराष्ट्राच्या समृद्ध लोककला परंपरेतील भारुड या सशक्त कला प्रकाराला आधुनिक सामाजिक जाणिवांची जोड देत, श्री पांडुरंग कृपा भारुड भजनी मंडळाने लग्नाची केली घाई, अन् जीव गेला बाई हे कौटुंबिक, हास्य-विनोदी नाटक दि. ४ ऑक्टोबर २०२५ रोजी सादर करून वैचारिक मंथन घडवले. पांडुरंग संस्थान येथील रंगमंदिरासमोर आयोजित या प्रयोगाला रसिकांनी उच्चांक गर्दी करत हाउसफुलचा मानदंड प्रस्थापित केला. श्री.पांडुरंग कृपा नवदुर्गा उत्सव मंडळाने आयोजित केलेल्या या नाट्यकृतीतून मनोरंजन आणि प्रबोधनाचा दुर्मीळ संगम साधण्यात आला. ज्वलंत विषयांवरील प्रखर भाष्य हे नाटक केवळ विदुषकी पात्रातील करमणूक नव्हते, तर ते माणुसकीच्या अस्तित्वावर प्रश्नचिन्ह निर्माण करणाऱ्या ज्वलंत सामाजिक समस्यांचे कठोर चित्रण होते. कौटुंबिक हिंसाचार, हुंडाबळी, बालविवाह, महिलांचा सासरी छळ प्रकरण, धनलोभाची लालसा आणि स्त्री हत्या यासारख्या



विकृत प्रवृत्तींवर या नाटकाने मार्मिक टोला दिला. लोकपरंपरा आणि भारुडाच्या,माध्यमातून करण्यात आलेले हे सडेतोड वैचारिक भाष्य, प्रेक्षकांना हसवून आणि नंतर विचार करण्यास लावून अंतर्मुखतेच्या वाटेवर घेऊन गेले.लोककलावंत जगनाथ चांगाडे यांच्या दिग्दर्शनात कलावंतांचा जिवंत अविष्कार दिग्दर्शक शाहीर जगन्नाथ चांगाडे रवींद्र सुरुशे यांच्या कसलेल्या मार्गदर्शनाखाली या नाट्यकृतीचा जिवंत आणि प्रभावी अविष्कार रंगभूमीवर अवतरला. प्रत्येक कलावंताने आपली भूमिका केवळ साकारली नाही, तर ती जगून दाखवली, यामध्ये उत्कृष्ट भूमिका रवींद्र सुरूशे, डिगांबर भराड, केशव मगर, सिताराम सुरूशे, शिवशंकर जुमडे,संतोष गोरे, मनोहर नखाते, मोहन मगर,योगेश मगर, देवाशिष वाघमारे आदि कलावंतांच्या सहज आणि प्रभावी अभिनयाने नाटकाला उंची प्राप्त झाली. तसेच, शिवशंकर बळी यांनी सूत्रसंचालनाच्या माध्यमातून नाटकातील मध्यस्थीची भूमिका पार पाडत कथानकाची धार अधिक तीव्र केली. अनेक वर्षांनंतर सादर झालेल्या या प्रयोगाची सांस्कृतिक अनुभूती रसिकांसाठी अविस्मरणीय ठरली.

# वृंदावन कॉलनीत शिक्षकाचे अपहरण व मारहाण

## सासरच्यांविरुद्ध बुलडाणा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल!

**जनसंचलन/बुलडाणा**

वृंदावन कॉलनी परिसरात शिक्षकाचे घरातून अपहरण करून मारहाण केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. शरद डिगांबर चेके (वय ३६, रा. वृंदावन नगर, माळविहीर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून बुलडाणा शहर पोलिसांनी सात आरोपींविरुद्ध विविध कलमांखाली गुन्हा नोंदविला आहे. फिर्यादी शरद चेके हे शरद पवार विद्यालय, सारोळा मारोती येथे शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. त्यांचा घटस्फोट झालेल्या पत्नी पल्लवीच्या नातेवाईकांनी हा प्रकार केल्याचे आरोप आहेत. दि. १२ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी साडेसातच्या सुमारास आरोपी अनिल दत्तात्रय आकाळ, कैलास ज्ञानबा आकाळ, विलास ज्ञानबा आकाळ, भगवान वसंता आकाळ, त्रिवेणी कैलास आकाळ, जागृती विलास आकाळ आणि मंदाबाई भगवान आकाळ (सर्व रा. भोरसा भोरसी, ता. चिखली) यांनी फिर्यादीच्या घराचा दरवाजा ठोठावून त्यांना बाहेर बोलावले आणि जबरदस्तीने क्रुझर ( २८ ३४८५) गाडीत टाकून भोरसा येथे नेले.




तेथे आरोपींनी चापटा-बुक्क्यांनी मारहाण करून धमक्या दिल्या की परत नांदायला आलास, तर जिवाने संपवू.फक्त त्यानंतर अमडापूर पोलिसांनी फिर्यादीला ताब्यात घेतले आणि खोट्या प्रकरणात अडकवले असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. या गंभीर प्रकरणी बुलडाणा शहर पोलीस ठाण्यात कलम १४०(३), १८९(२), १९०, १९१, ३५१(२), ३५१(३), ११५(२) अंतर्गत गुन्हा दाखल झाला असून तपास जयसिंग राजपूत करत आहेत. शहरात या घटनेने खळबळ उडाली आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८